**Office of the Additional Principal Chief Conservator of Forests, Mangrove Cell, Mumbai**
302, Wakefield House, 3rd Floor, Ballard Estate, Above Britannia & Co. Restaurant, Fort, Mumbai-400 001
Ph: 022-22694984, 22694985, Email: ccfmmumbai@gmail.com / dcfmangrovecell@gmail.com

ADMIN / 2018 – 19 / 58 Date: 30th September, 2019

To,
The Prothonotory and Senior Master
Hon'ble High Court ,Mumbai.

Sub: - Compliance report by the Mangrove Monitoring Committee as per the Directions of Hon'ble Bombay High Court order dated 17th September, 2018 in PIL 87/2006 .

The Hon'ble Bombay High Court vide order dated 17th September, 2018 in PIL 87 of 2006 has directed the monitoring committee headed by the Divisional Commissioner to submit a Compliance report in every three months. Accordingly, I humbly submit the third compliance report of the said committee. The same may please be brought to the notice of Hon'ble Bombay High Court.

(.)
Member Secretary
State Mangrove Monitoring Committee
And
Deputy Conservator of Forest, Mangrove Cell.

Copy to: Government Pleader (Original side), Bombay High Court.
Copy to: Chairman, State Mangrove Monitoring Committee and Divisional Commissioner, Konkan Division.
Copy to: Additional Chief Secretary (Revenue), Government of Maharashtra.
Copy to: Secretary (Forest), Government of Maharashtra.

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**ORDINARY ORIGINAL CIVIL JURISDICTION**

**PUBLIC INTEREST LITIGATION NO. 87 OF 2006**

Bombay Environment Action Group and another .... Petitioners

VS

The State of Maharashtra and others ....Respondents

## 3rd Compliance Report of the Mangrove Monitoring Committee

| Paa. No. | Order | Compliance | Remarks |
|---|---|---|---|
| **85** | (B) The following direction issued in terms of clause 8(viii) of the order dated 6th October 1005 has been substantially complied with :<br>"The areas shown as mangrove area in the satellite study report "Mapping of mangroves in the Maharashtra State using Satellite Remote Sensing" dated August, 2005, prepared by the Maharashtra Remote Sensing Application Centre (MRSAC) for the MCZMA which was submitted to this Court on 29th August, 2005, form part of Phase I of the mapping by MRSAC. The MRSAC will, in Phase II, carry out mangroves study using high resolution for detailed mapping of mangroves with a view to identify more precisely mangrove areas in Mumbai and NaviMumbai. After receiving the said satellite data, transfer of mangrove details on city survey/village maps(cadastral map) will be carried out within a period of 6 months from today". | The Chief Secretary has directed Director MRSAC to carry out Mangrove study by using high resolution for detail mapping of mangroves, after receiving said Satellite data and transfer of mangrove details on city survey / village maps by 17th March 2019. | MRSAC prepared high resolution maps of Mumbai and Navi Mumbai Mangrove areas. The transfer of Mangrove land to forest department is going on. |
| | (C) The directions in sub clauses(ix) to (xiii) of clause 8 of the order dated 6th October 2005 shall continue to operate as final directions in respect of mangrove areas only on the government lands and the lands held by Planning Authorities like CIDCO, MMRDA etc. In respect of the lands admeasuring 2823.8493 Hectares as | The chief secretary of Maharashtra has issued following directions in the meeting held on 17th November 2018<br>1. All the Municipal Corporations, CIDCO, MMRDA, MHADA, MIDC, Revenue Department and other concerned agencies to | 1596 ha. hectares are mostly in Raigad (1196 ha), Sindhudurg (115 ha), Mumbai sub |

| | | | |
|---|---|---|---|
| | stated in the affidavit dated 14th February 2018 of Shri MilindPanditrao, the direction regarding transfer of the lands to the Forest Department and consequential directions regarding making revenue entries shall be complied with within a period of three months from the date on which this Judgment and Order is uploaded. The State Government shall identify the mangroves lands which were vested in it by virtue of section 3(1) of the Private Forest Act and shall take appropriate steps in respect of such lands for transferring such lands to Forest Department within a period of 18 months from today. It will be also open for the State Government to take recourse to section 21 of the Private Forest Act in appropriate cases; | expedite the process of identification of government mangrove land, their notification as Reserved Forest and subsequent transfer to Forest Department.<br><br>2. Instructions were given to all the District Collectors to complete the transfer of entire notified mangrove area and to make revenue entries before the dead line given by the Honourable High Court i.e. by 16th December 2018. Wherever areas notified under section 4 have been excluded after inquiry by the Forest Settlement Officer, the orders should be shared with Forest Department, So that wherever felt necessary by that latter, an appeal can be preferred. | urban (242.076 ha),Thane (5.66 ha), Palghar(34.2 ha) are pending for transfer |
| | (D) We direct the State Government to constitute a Committee headed by the Divisional Commissioner, as agreed by the State Government. The Committee and subcommittees shall be formed in accordance with the observations made in paragraph 68 above. The committee shall be responsible for the reservation and conservation of mangroves, for restoration of reclaimed mangroves areas set out in paragraph 73 above and for implementation of the directions in this Judgment. The Committee shall be constituted within a period of one month from today. The sub committeesas observed in paragraph 68 shall be constituted within two months from today. The Committee shall hold regular meetings and the minutes of the meeting shall be made available on public domain as observed in paragraph 68 above. As directed under the order dated 6th October 2005, the Principal Secretaries of (1) Environment, (2) Revenue and (3) Forest Department of the Government of | 1) Monitoring Committee headed by the Divisional Commissioner has met Three times (in 16th May 2019, 29th June 2019 and 6th August 2019). The minutes of the meeting is enclosed (**Annexure 1**). District wise list of complaints and action taken thereof are enclosed in **Annexure-2**<br><br>2) Committee headed by ACS (Revenue) constituted vide Gr No. S-30/2018/CN/ 592/F-3 dated 15 December 2018 to monitor the monitor the working of the Committee headed by Divisional Commissioner. The first meeting was held on 2/4/2019<br><br>5) The Secretariat will be housed in the Mangrove Cell/ Konkan | |

| | | | |
|---|---|---|---|
| | Maharashtra shall be overall in charge for ensuring total compliance with the directions issued under this Judgment and Order. They will monitor the working of the Committee headed by the Divisional Commissioner; | Bhawan and necessary funds for establishing the Secretariat will be provided by the Mangrove Foundation. The recruitment was conducted on 22nd August 2019. However eligible candidates were not available. The recruitment will be conducted again. | |
| | (G) We direct that it is the obligation of the State to replant destructed mangroves and to restore mangroves areas which are illegally reclaimed. The said areas shall be restored to its original condition. In what manner restoration shall be done must be decided by the Committee headed by the Divisional Commissioner after consulting experts in the field. The Committee shall identify the vulnerable mangroves areas in the State and direct its constant surveillance by the Police/Forest Guards/Security Guards of the Maharashtra Security Corporation. The Committee shall ensure that barricades are erected for preventing the entry of vehicles in such vulnerable area. The Committee shall also consider of installing CCTVs along the vulnerable stretches to keep a vigil. The Committee shall also cause to undertake satellite mapping of mangroves area in the state at periodical intervals of not more than six months by using resolution as suggested in paragraph no.28 of the note submitted by the learned senior counsel appearing for the petitioner. Any changes seen shall be considered by the Committee and remedial measures shall be taken. The State Government shall sanction necessary amount for that purpose; | 1) In most of the cases immediate availability of fund to restore the mangrove land is not available and especially in private area the authority will face problem. Even if the restoration cost of land is recovered from the offender as an arrears of land revenue under Maharashtra Land Revenue Code but restoration work will get affected because of immediate unavailability of fund. Hence the Committee has directed<br>a) Respective Municipal Corporations to take up responsibility of restoration of destructed areas in their jurisdiction (Urban area).The necessary funds can be demanded from the government.<br>b) For the rural areas, Mangrove Foundation will initially use its resources for restoration and if such funds are not sufficient, additional grants will be sought by Mangrove Cell from the government.<br>2) The committee is of the opinion that, the exercise to identify the vulnerable mangrove areas from each district will require sufficient time. Hence it has directed concerned forest division of each district to make a survey and identify these areas and the action plan will be prepared accordingly to have constant vigil on those lands. | No such reclamation work was carried out so far. BMC has informed in the Mangrove coordination committee meeting that tender processing of reclamation is going on.<br><br>The process is delayed due to the lack of funding in the Municipal corporation as said in the meeting. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 3) A project has been given to Indian Institute of Space science and Technology, Thiruvananthapuram (Institute under ISRO) by Mangrove Foundation to undertake the satellite mapping of mangroves of Maharashtra at periodical interval of six months. | |

(Neenu Somaraj)
Member Secretary
State Mangrove Monitoring Committee
And Deputy Conservator of Forest, Mangrove Cell.

# Annexure 1

## Mangrove Monitoring Committee

| Sr. No. | Attachments |
|---|---|
| | |
| 1 | GR of Mangrove Monitoring Committee |
| 2 | Minutes of 16 / 05/ 2019 |
| 3 | Minutes of 29/ 06/ 2019 |
| 4 | Minutes of 06/ 08/ 2019 |

Deputy Conservator of Forests, Mangrove Cell, Mumbai
सत्यमेव जयते
★ Mumbai ★

राज्यातील सागर तटीय जिल्हयांकरिता कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सनियंत्रण समिती गठीत करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र. ४६२/फ-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०१८.

पहा :-

१) मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. २१८/२०१३ मधील दिनांक ३ व ४ ऑगस्ट, २०१५ चे अंतरिम आदेश.
२) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ३.१०.२०१५.
३) मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. ४६/२०१३ मधील दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीचे आदेश.
४) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १३.१०.२०१६.
५) मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. ८७/२००६ मधील दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजीचा न्यायनिर्णय.

प्रस्तावना :-

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. २१८/२०१३ मध्ये याचिकाकर्ते नवी मुंबई एन्व्हायरमेंट प्रिझर्वेवेशन सोसायटी मध्ये दिनांक ३ व ४ ऑगस्ट, २०१५ रोजी सुनावणी घेऊन पारित केलेल्या निर्णयानुसार नवी मुंबई क्षेत्रातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनासाठी शासन निर्णय दिनांक ३.१०.२०१५ अन्वये विभागीय आयुक्त, कोंकण यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली होती. तसेच जनहित याचिका क्र. ४६/२०१३ व जनहित याचिका क्र. २१८/२०१३ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी एकत्रितरित्या पारित केलेल्या अंतरीम आदेशानुसार मुंबई व मुंबई उपनगर जिल्हातील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ३.१०.२०१५ अन्वये विभागीय आयुक्त, कोंकण यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली होती.

आता जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी मा.न्यायालयाने न्यायनिर्णय दिलेला आहे. सदर न्यायनिर्णयातील परिच्छेद ८५ (डी) खालील प्रमाणे आहे -

*"We direct the State Government to constitute a Committee headed by the Divisional Commissioner, as agreed by the State Government. The Committee and sub-committees shall be formed in accordance with the observations made in paragraph 68 above. The committee shall be responsible for the preservation and conservation of mangroves, for restoration of reclaimed mangroves areas set out in paragraph 73 above and for implementation of the directions in this Judgment. The Committee shall be constituted within a period of one month from today. The sub-committees as observed in paragraph 68 shall be constituted within two months from today. The Committee shall hold regular meetings and the minutes of the meeting shall be made available on public domain as observed in paragraph 68 above. As directed under the order dated 6th October, 2005 the Principal Secretaries of (1) Environment, (2) Revenue and (3) Forest Department of the Government of Maharashtra shall be overall in-charge for ensuring total compliance with the directions issued under this Judgment and Order. They will monitor the working of the Committee headed by the Divisional Commissioner;"*

राज्यात मुंबई व मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयांत विस्तीर्ण सागरी किनारा असून एवढया मोठया क्षेत्रावर असलेल्या कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करणे आवश्यक आहे. यापूर्वी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नवी मुंबई व मुंबई - मुंबई उपनगर क्षेत्रासाठी अनुक्रमे दिनांक ३.१०.२०१५ व दिनांक १३.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या सनियंत्रण समित्या बरखास्त करुन मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १७.०९.२०१८ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार राज्यातील कांदळवन असलेल्या ७ सागरी जिल्हयासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एकच सनियंत्रण समिती गठीत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या सागरतटीय जिल्हयांकरिता कांदळवनांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सनियंत्रण समिती पुढील प्रमाणे गठीत करण्यात येत आहे -

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | समितीतील स्थान |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त कोंकण विभाग, नवी मुंबई. | अध्यक्ष |
| २ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई | सह अध्यक्ष |
| ३ | पोलीस आयुक्त, मुंबई / ठाणे/ नवी मुंबई यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ४ | पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) / रायगड / पालघर / रत्नागिरी / सिंधुदूर्ग यांचे प्रतिनिधी (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी) | सदस्य |
| ५ | आयुक्त, महानगर पालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईदंर/ वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल/ भिवंडी-निजामपूर / उल्हासनगर यांचे प्रतिनिधी. (उप आयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी) | सदस्य |
| ६ | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे | सदस्य |
| ७ | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी) | सदस्य |
| ८ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) चे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) चे प्रतिनिधी | सदस्य |
| १० | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) चे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| १२ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| १३ | सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) | सदस्य |
| १४ | जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ रायगड/ पालघर/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग. | सदस्य |
| १५ | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी. | सदस्य |
| १६ | उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई. | सदस्य सचिव |

| | | |
|---|---|---|
| १७ | विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक | सदस्य |
| १८ | नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| १९ | बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रूप यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| २० | वनशक्ती (NGO) यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| २१ | महाराष्ट्र मच्छीमार कृती संघ यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| २२ | संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी. | सदस्य |

उपरोक्त सनियंत्रण समितीची बैठक महिन्यातून किमान एक वेळा घेण्यात यावी. सदर बैठक व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे देखील घेण्याची मुभा राहील.

<u>समितीचे कार्य-</u>

१) कांदळवन संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणा / संस्था / अधिकारी यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांचा तत्पर व परिणामकारक वापर करुन घेणे व सर्व शासकीय यंत्रणांमध्ये योग्य समन्वय ठेवणे.

२) कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन तसेच बाधीत क्षेत्रावर तज्ञाच्या सल्ल्याने कांदळवनांची पुन:स्थापना (Restoration) करणे.

३) कांदळवनासंदर्भात तक्रारी व तक्रारींचे निराकरण यासाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षासह एक स्वतंत्र सेक्रेट्रिएट तयार करणे.

४) कांदळवन क्षेत्रात भारतीय वन अधिनियम, १९२७, वन संवर्धन अधिनियम, १९८० व पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चा भंग होणार नाही, याची दक्षता घेणे.

५) समितीच्या मासीक मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणी बाबतच्या कामाचा आढावा घेणे. तसेच सदर बैठकींचे इतिवृत्त विभागीय आयुक्त, कोंकण यांच्या संकेतस्थळावर किंवा समर्पित संकेतस्थळावर (dedicated website) प्रसिध्द करणे.

६) राज्यातील संवेदनशिल कांदळवन क्षेत्र निश्चित करणे व सदर क्षेत्रावर पोलीस यंत्रणा/ वनरक्षक/ महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्यामार्फत निगरानी (surveillance) ठेवणे.

७) संवेदनशिल कांदळवन क्षेत्रात वाहनांना प्रवेशबंदी करण्यासाठी अडथळे निर्माण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.

१०) संवेदनशिल कांदळवन क्षेत्रास बाधा पोहचविण्याऱ्या उपद्रवींवर निगरानी ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार सीसीटीव्ही बसविण्याबाबत निर्णय घेणे.

११) राज्यातील कांदळवन क्षेत्राचे दर सहा महिन्यांनी उपग्रहाद्वारे उच्च पृथ्थकरण (Satellite high resolution images) वापरुन नकाशे तयार करुन घेणे व त्यानुसार काही बदल आढळून आल्यास तो समितीने विचारात घेवून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

१२) समितीने केलेल्या कार्यवाहीबाबतचा प्रथम अनुपालन अहवाल मा.उच्च न्यायालयास दिनांक १ डिसेंबर, २०१८ पूर्वी सादर करणे व तद्नंतर प्रत्येक तीन महिण्यानी सादर करणे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनासाठी जिल्हा / तालुका स्तरावर उप समित्या गठीत करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोंकण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आंत सदर समित्या गठीत कराव्यात व त्यांच्या कामाचे सनियंत्रण करावेत. समित्या गठीत झाल्यानंतर विभागीय आयुक्त, कोंकण यांनी सदर समित्यांची पुरेशी प्रसिध्दी करावी. समितीकडे नागरीकांना आपल्या लेखी तक्रारी नोंदविता येतील याबाबत व त्यासाठी उपलब्ध विविध मार्ग नागरिकांना प्रसिध्दीद्वारे कळवावे.

राज्यातील कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमण, कांदळवनाची तोड, अनधिकृत बांधकामे व इतर सर्व तक्रारींच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तक्रार निवारण यंत्रणा (Grievance Redress Mechanism) स्थापन करण्याबाबतची कार्यवाही वेगळयाने करण्यात येईल. प्रस्तावित तक्रार निवारण यंत्रणेकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर सनियंत्रण समितीने तातडीने कार्यवाही करुन कांदळवनावर अतिक्रमण / नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी आवश्यकता असल्यास स्थानिक पोलीस प्रशासनाची मदत घेण्यात यावी.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना काही अडचणी उदभवल्यास विभागीय आयुक्त, कोंकण यांनी त्याबाबत शासकीय अभियोक्ता यांच्यामार्फत मा.न्यायालयास निदर्शनास आणून द्यावे.

विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उपरोक्त सनियंत्रण समितीच्या कामावर पर्यावरण विभाग, महसूल विभाग व वन विभाग यांच्या सचिवांमार्फत सनियंत्रण केले जाईल. त्यासाठी विभागीय आयुक्त, कोंकण हे समितीच्या मासिक बैठकीचे इतिवृत्त तसेच मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात येणाऱ्या त्रैमासिक अहवालाची प्रत संबंधित सचिवांना सादर करतील.

सदर समितीवर नियुक्त अशासकीय सदस्यांचा कालावधी १ वर्षासाठी मर्यादित राहील. सदर अशासकीय सदस्यांना रु. ८९००/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या दराने प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकुलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८१०१६१७०८०३००१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.10.16 17:13:42 +05'30'

( वीरेंद्र तिवारी )
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रति,

१) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
४) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
८) अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
९) विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण.
१०) आयुक्त, महानगर पालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईदंर/ वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल/ भिवंडी-निजामपूर / उल्हासनगर.
११) पोलीस आयुक्त, मुंबई / ठाणे/ नवी मुंबई.

१२) जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे/ रायगड / पालघर / रत्नागिरी / सिंधुदूर्ग.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ, मुंबई.
१४) मुख्य महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
१५) व्यवस्थापकीय संचालयक,शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO).
१६) व्यवस्थापकीय संचालयक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
१७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी.
१८) सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
१९) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे / कोल्हापूर.
२०) जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) / रायगड / पालघर / रत्नागिरी / सिंधुदूर्ग.
२१) उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
२२) उप वनसंरक्षक, ठाणे, डहाणू, जव्हार, रोहा, अलिबाग, शहापूर, सावंतवाडी.
२३) विभागीय वन अधिकारी, चिपळून स्थित रत्नागिरी.
२४) विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक
२४) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण.
२५) नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
२६) बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रूप.
२७) वनशक्ती (NGO).
२८) महाराष्ट्र मच्छीमार कृती संघ.
२९) संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनीक्र.०२२-२२६१४९८४,२२६१४९८५, Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com

**विषय:-** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र./ल. ले/२२ /सन २०१९-२०

फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: १९/०६/२०१९.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
४. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
५. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/ नवी मुंबई यांचे प्रतिनिधी.
६. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली /मिरा-भाईंदर /वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल /भिवंडी-निजामपूर / उल्हासनगर यांचे प्रतिनिधी. (उप आयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
७. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
९. पोलीस अधिक्षक,ठाणे(ग्रामीण) रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग यांचे प्रतिनिधी (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे पोलीस अधिकारी)
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
११. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) चे प्रतिनिधी.
१२. शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) चे प्रतिनिधी.
१३. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) चे प्रतिनिधी.
१४. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी.
१५. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांचे प्रतिनिधी.
१६. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी
१७. नवी मुंबई एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी
१८. बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्श्न ग्रुप यांचे प्रतिनिधी
१९. वनशक्ती (NGO) यांचे प्रतिनिधी
२०. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२१. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)

संदर्भ :- शासन निर्णय क्र. एस-३०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र.४६२/फ-३,दि. १६ ऑक्टोबर, २०१८.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **पाचवी** बैठक **गुरुवार,** दिनांक **१६/०५/२०१९** रोजी **सायंकाळी ४.००** वाजता मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतिवृत्तातील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन कांदळवन तक्रारींबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

सदस्य सचिव
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ५ थी बैठक**
**दिनांक १६/०५/२०१९ रोजीचे इतिवृत्त**
**मा.विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली सदरची बैठकीत घेण्यात आली. उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. नरेश झुरमुरे | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे |
| २ | डॉ. बेन व्ही. क्लेमेंट | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर | मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर |
| ३ | श्रीमती. निनु सोमराज | उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ४ | श्री. सिध्दराम सालीमठ, | उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग. | विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई. |
| ५ | श्री. विकास जगताप | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ६ | श्री. दिपक पुजारी | उप-आयुक्त,मीरा,भाईंदर महानगरपालिका | आयुक्त मीरा, भाईंदर महानगरपालिका |
| ७ | श्रीम. संध्या बावनकुळे | उप आयुक्त, पनवेल | आयुक्त, पनवेल महानगरपालिका |
| ८ | श्री. अधिक पाटील | तहसिलदार ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| ९ | श्री. दिनेश पैठनकर | नायब तहसिलदार ठाणे | निवारी उप जिल्हाधिकारी ठाणे |
| १० | श्री. अमित सानप | तहसिलदार पनवेल | जिल्हाधिकारी रायगड |
| ११ | श्री. किरण सुरवसे | तहसिलदार वसई. | तहसिलदार वसई जि. पालघर |
| १२ | श्री. संतोश जाधव | तहसिलदार रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी |
| १३ | श्री. विशाल दऊंडकर | तहसिलदार (महसूल) | जिल्हाधिकारी रायगड |
| १४ | श्रीमती कल्पना गोडे | तहसिलदार, उरण | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| १५ | श्री. अशोक वाघाये | नोडल अधिकारी | एम.एम.आर.डी.ए. |
| १६ | श्री. विकास गजरे | निवासी उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी पालघर |
| १७ | श्री. स्टॅलिन डी. | संचालक | वनशक्ती |
| १८ | श्री. अनुपम वर्मा | नोडल अधिकारी | नवीमुंबई एन्वायरमेंट प्रीझरवेशन सोसायटी |
| १९ | श्रीमती. मनिषा प्रधान | प्रदुषण नियंत्रण अधिकारी | ठाणे महानगरपालिका |
| २० | श्री. अविनाश शिंदे | उपविभागीय अधिकारी, ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| २१ | श्री. प्रमोद पाटील | नोडल अधिकारी | सिडको, नवी मुंबई. |

प्रथमत: मुंबई - मुंबई उपनगरे कांदळवन सनियंत्रण समितीच्या तक्रारींवर केलेली कार्यवाहीबाबत चर्चा झाली.

तद्नंतर या समितीकडे प्राप्त तक्रारींवर केलेली कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे चर्चा झाली.

| तक्रार क्र. | तक्रार | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | **मुंबई, मुंबई उपनगर कांदळवन समितीच्या तक्रारींबाबत..** | | |
| १ | कांदळवन क्षेत्रातील डेब्रिस काढून टाकणे. | • समितीने लवकरात लवकर कांदळवन क्षेत्रातील डेब्रिज काढून टाकून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना उपस्थित सहाय्यक आयुक्त, मुंबई महापालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या होत्या.<br>• परंतु मुंबई महापालिकेमार्फत अद्याप या बाबत कार्यवाही झालेली नाही असे समजले त्या अनुषंगाने समितीने मुंबई महापालिकेच्या उपस्थित प्रतिनिधींना या तक्रारीवर गांभीर्यने योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्याबाबतचे आदेश दिले. | मुंबई महापालिका<br>महसुल<br>वन<br>म्हाडा |
| २ | श्री. रेजी अब्राहम, अध्यक्ष, युनायटेड असोसिएशन यांनी दाखल केलेल्या तक्रारींचीचौकशी सत्वर करून आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करणे.<br>१. लक्ष्मीनगर, मधील कांदळवन ऱ्हासाबाबत.<br>२. डिंगेश्वर मंदिराभोवतालचे क्षेत्र. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी अतिक्रमण हटविण्याचे काम जून मध्ये सुरु करण्यात येणार आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे |
| ३ | तक्रारीसाठीचे संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत. मालाड (प), लगुन रोड व चारकोप तक्रार क्र. २८/२०१७, ४४ ते ४८ / २०१७ | • या जागेवरील **डेब्रिज काढून टाकण्याच्या सूचना** सदस्य सचिवांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर आणि मुंबई महानगरपालिका यांना दिल्या.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | महसूल, महापालिका, पोलिस<br><br>जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ४ | कुंभारकला येथे गटार बांधणीबाबत. | • वन परिक्षेत्र अधिकारी पश्चिम मुंबई यांच्या दि. ०२.१२.२०१६ रोजीच्या अहवालानुसार सदर क्षेत्रात MRSAC गुगल अर्थवर सुपर इंपोझ केले असता कांदळवन दिसुन येत नाही. सदर क्षेत्रा हे ७/१२ प्रमाणे खाजण अशी नोंद असून हे अधिसुचित राखिव कांदळवनाचा भाग नाही. सदर तक्रार ही कांदळवनाशी निगडीत नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | मुंबई महापालिका<br>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| ५ | सदस्य श्री. रेजी अब्राहम यांचे दि. १९/०४/२०१८ रोजीचे निवेदन. | • समितीने दि.२७ फेब्रुवारी २०१९ रोजी या बाबत बैठक ठेवून श्री.रेजी अब्राहम यांच्या सर्व तक्रारींबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत योग्य ती कार्यवाही करुन या तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• परंतु अद्याप अहवाल प्राप्त न झाल्याने समितीने तात्काळ एक आठवडयात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. | मुंबई महापालिका<br>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| ६ | श्रीं. रेजी अब्राहम यांचे दि. 26/05/2018 च्या इमेल वरुन मिळालेले दि. 28/05/2018 चे | • टिपू सुलतान ग्राऊंड, लागुन रोड, मालवणी मालाड (प.) येथील उपजिल्हाधिकारी (अ.नि.) यांच्यामार्फत केलेले निष्कासनाचा अहवाल सादर करणे. | पोलिस |

| | | | |
|---|---|---|---|
| | निवेदन. | • समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींना याबाबत निष्कासनाचा अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• परंतु अद्याप अहवाल प्राप्त न झाल्याने समितीने तात्काळ एक आठवडयात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. | मुंबई महापालिका<br><br>जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ७ | श्री. रेजी अब्राहम यांची दि. 31/07/2018 ची तक्रार | • जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांनी तक्रारदार श्री. रेजी अब्राहम व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेवून व समन्वय साधून केलेले कार्यवाही बाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीमध्ये दिल्या होत्या.<br>• या बाबत दि.१३.११.२०१८ रोजी सयुक्त बैठक घेतली असलेचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले होते.<br>• परंतु अद्याप अहवाल प्राप्त न झाल्याने समितीने तात्काळ एक आठवडयात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे |
| ८ | श्री. रेजी अब्राहम यांची दि. 04/09/2018 ची तक्रार | • रेजी अब्राहम यांच्या कोणत्याही तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सादर केलेला नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने रेजी अब्राहम यांच्या तक्रारींवर गांभीर्यपूर्वक विचार करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सदस्य सचिवांना सादर करण्याचे आदेश दिले. | मुंबई महानगरपालिका जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे आणि MHADA |

**कांदळवन समितीच्या तक्रारींवर झालेली चर्चा**

| तक्रार क्र. | तक्रार | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | **तक्रार क्र. १**<br>श्री. राजेंद्र पाटील दि.१९.११.२०१८<br>Destructioin of mangroves due to slum encroachment and debris is dumping at mangroves behind Neminath Heights Bldg, Gaurav city, near Mayor Bungalow, Mira road east. | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी दि.३१.०५.२०१८ रोजी स्थळ पाहणी केली असून सदर जागेवर ५० मी. अंतरावर भरणी केल्याचे दिसून येते असे सांगितले होते.<br>• सदर जागेवरील डेब्रिज हटविण्यासाठी समितीने उप आयुक्त मिराभाईंदर यांना कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच डेब्रिज नेणाऱ्या प्रत्येक वाहनास GPS कायम स्वरुपी लावण्याचे निर्देश दिले तसेच CRZ 1 चे उल्लंघन झाल्यामुळे समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांनी FIR दाखल करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| २ | **तक्रार क्र. ७**<br>श्री. मंगेश गांधी दि.२३.११.२०१८ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-1<br>Debris dumping in Gorai creek Mangroves | • या तक्रारी संदर्भात DCP बोरीवली पोलीस स्टेशन यांनी दि.२५.०३.२०१९ रोजी EPA अंतर्गत गुन्हा दाखल केला असल्याचे सदस्य सचिवांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>२. BMC |
| ३ | **तक्रार क्र. ८**<br>श्री. बी.एस. यादव-<br>दि.२६.११.२०१८ | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचया पतिनिधींनी सदर ठिकाणी कांदळवन नसल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत केलेल्या | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-2<br>Mangrove Destruction | कार्यवाहीचा अहवाल सदस्य सचिवांना देण्याबाबत समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना सांगितले. | |
| ४ | **तक्रार क्र. ९**<br>श्री. जयेश गुप्ता –<br>दि.२४.११.२०१८<br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe-Desai-Khardi Gaon, Thane. | • तहसिलदार यांच्या अहवालानुसार तेथे कांदळवनाचा नाश झाल्याचे आज रोजी दिसून येत नाही त्यामुळे या पूर्वी सदर ठिकाणी कांदळवन आहे किंवा कसे हे तपासण्याची आवश्यकता आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांना सदर जागेचे Geo-Co-ordinates सदस्य सचिवांना देण्यास सांगितले व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>• तसेच सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याच्या सूचना समितीने ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या. | १. जिल्हाधिकारी ठाणे आणि<br>२. आयुक्त ठाणे महानगरपालिका |
| ५ | **तक्रार क्र. १२**<br>श्री. लुक मेंन्डीस दि.३०.११.२०१८<br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • या तक्रारीबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या दि.१९.०१.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदरचे क्षेत्र हे माहिम विभागातील असून अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्राच्या हद्दीबाहेर १५ ते २० मी. अंतरावर बफर झोन मध्ये आहे. सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झालेले नसून तेथे डेब्रिज टाकण्यात आलेला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने महानगरपालिकेला २ महिन्यात सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याचे निर्देश दिले होते.<br>• परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही असे समितीच्या निदर्शनास आले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तात्काळ कार्यवाही करुन अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई. |
| ६ | **तक्रार क्र. १३**<br>श्री. अमित शुक्ला -<br>दि.०१.१२.२०१८<br>Debris on Water Body | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांच्या दि.२२.०२.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार हिरानंदानी फोर्टीस हॉस्पीटलच्या परिसरामध्ये, कोठेही कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून आलेले नाही.<br>• या तक्रारीबाबत सदर जागेचे Geo-Co-ordinates नुसार पाणथळ क्षेत्र नसल्याचे दिसून येते.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी ठाणे, |
| ७ | **तक्रार क्र. १६**<br>श्री. धिरज परब –<br>दि.०३.१२.२०१८<br>मीरा भाईंदर महापालिकेने भाईंदर पश्चिम येथे सुभाषचंद्र बोस नावे कांदळवन, पाणथळ व सीआरझेड बाधित क्षेत्राचा ऱ्हास चालवल्या बाबत | • तहसिलदार ठाणे यांच्या दि. १४.०१.२०१९ रोजी दिलेल्या अहवाला दिलेल्या Geo-Co-ordinates नुसार या क्षेत्रात कोठेही कांदळवन दिसून येत नाही आणि MRSAC च्या नकाशामध्येही सदर क्षेत्र अधिसूचित पाणथळ क्षेत्र नसल्याचे दिसून येते.<br>• तहसिलदार ठाणे यांनी सदर ठिकाणी मैदाना शेजारी कांदळवन आहे. त्याचे पूर्वी नुकसान झाले होते त्या नुसार कार्यवाही देखील करण्यात आलेली आहे असे त्यांनी | जिल्हाधिकारी, ठाणे<br>अहवाल अप्राप्त<br>Pending all |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | |
| ८ | **तक्रार क्र. १७**<br>श्री.धिरज परब दि.०५.१२.२०१८<br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • दि.८.०२.२०१९ समितीने उपसमितीमार्फत स्थळ पाहणी केली. या ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाले असल्याचे दिसते. तसेच MRSAC २००५ च्या नकाशावरुन देखील सदर क्षेत्र हे कांदळवन क्षेत्र दिसून येते.<br>• त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, ठाणे यांना सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाले असल्यामुळे सेव्हन इलेव्हन हॉटेल यांच्या विरुध्द कारवाई करण्याकरिता शिफारस करण्यात येत आहे.<br>• या तक्रारी संदर्भात पोलीस विभागाकडून तपासणी चालू आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने संबंधीतांवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना ठाणे पोलीस अधिकाऱ्यांना दिल्या. | जिल्हाधिकारी, ठाणे |
| ९ | **तक्रार क्र. १८**<br>उत्कर्ष सार्वजनिक मित्र मंडळ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार KMC-3 दि.०३.१२.२०१८<br>Mangroves Cutting in Gorai Sector 2 | • समितीने तात्काळ सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही करण्यास व या जागेचे लवकरात लवकर Restoration करण्यास सांगितले व त्या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सदर जागेवर भराव केल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. मुंबई महानगरपालिका |
| १० | **तक्रार क्र. २०**<br>श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०९.१२.२०१८<br>Mangrove destruction across Uran-1 | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार उरण यांनी या ठिकाणी ही तक्रार उरण येथील पंजाब वेअरहाऊस NH 4 येथील असून सदर ठिकाणी कांदळवनात येणारे पाणी बंद झाले होते ते सुरु करण्यात आले आहे.<br>• तसेच या तक्रारी बाबत तक्रार न्यायालयात देखील दाखल केली आहे असे तहसिलदार उरण यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल सादर करण्यास तहसिलदार उरण यांना सांगितले. | १. जिल्हाधिकारी, रायगड<br>२.सिडको,नवी मुंबई. |
| ११ | **तक्रार क्र. २१**<br>श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>दि.०९.१२.२०१८<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • तहसिलदार ठाणे यांच्या दि.२२.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झालेले नसून कांदळवनालगत भराव झालेला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने सदरचा भराव हटविण्यासाठी PWD यांना पत्र देण्यात आले आहे परंतु त्यांच्याकडून अद्याप काही प्रतिसाद मिळालेला नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी आणि PWD यांच्यामार्फत भराव हटविण्याची कार्यवाही करावी व अहवाल सादर करण्यास तहसिलदार ठाणे यांना सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे आणि नवी मुंबई महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | **तक्रार क्र. २२**<br>श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>दि.०९.१२.२०१८<br>Mangrove destruction across Uran-2 | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार उरण यांनी चाणजे ग्रामपंचायत यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• समितीने या तक्रारबाबतचा अहवाल सदस्य सचिवांना पाठविण्यास सांगितले व ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, रायगड |
| १३ | तक्रार क्र. २३<br>श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>Mangrove destruction across Uran-3 | • ही तक्रार दस्तान फाटा जसई, उरण येथील असून MRSAC नकाशानुसार हे पाणथळ क्षेत्र नसल्याचे दिसते.<br>• त्या अनुषंगाने समितीने ही तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी, रायगड |
| १४ | **तक्रार क्र. २४**<br>श्री. दिपक कामथ -<br>दि.०९.१२.२०१८<br>Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area | • या तक्रारीबाबत विभागीयं वन अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार सदरचे क्षेत्र अधिसुचित राखीव वन कांदळवनाच्या हद्दी बाहेर येत असून तक्रारीत नमुद जागा बफर झोन हि महसुल विभागाच्या ताब्यात येते.<br>• तसेच सदर ठिकाणी पाणथळ क्षेत्र नाही व कोठेही कांदळवनाचे नुकसान झालेले नसुन भराव व डेब्रिज असल्याचे दिसते.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर आणि वन विभाग यांच्यामार्फत पावसाळयापूर्वी सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याच्या सुचना दिल्या. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, मुंबई महानगरपालिका आणि वन विभाग |
| १५ | **तक्रार क्र. २५**<br>अज्ञात व्यक्ती - दि.०९.१२.२०१८<br>वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार<br>KMC-6<br>Destruction of Mangroves. | • सदरची तक्रार ही अज्ञात व्यक्तीद्वारे कांदळवनाच्या वेबसाईटद्वारा प्राप्त झाली असून या तक्रारीमध्ये योग्य जागेची माहिती दिलेली नाही.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| १६ | **तक्रार क्र. २६**<br>श्री. विनोद पुन्शी दि.११.१२.२०१८<br>Dumping of Debris on DPS Road within 50 meters of mangroves. Sector - 52, Nerul, Navi Mumbai, | • सिडको यांच्या दि.०१.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर जागेवर रस्त्यावर माती टाकल्याचे आढळले. मातीचा ढीग काढण्यासाठी निविदा प्रक्रीया चालू केली असून प्रक्रीया पूर्ण होताच रस्त्यावरील माती काढली जाईल असे नमूद केले आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने मातीचे ढीग काढण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्यास सिडको यांच्या प्रतिनिधींना सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | १. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.<br>२. सिडको, नवी मुंबई |
| १७ | **तक्रार क्र. २७**<br>श्री. डेबी गोएंका -<br>दि.१२.१२.२०१८<br>Destruction of mangroves by INS Hamla at Marve | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी INS हमला येथे कांदळवनापासून ५० मिटरच्या आत भराव करुन खेळाचे मैदान तयार केल्यामुळे २०१६ मध्ये त्याच्या Contractor वर FIR दाखल केला आहे असे त्यांनी सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • तसेच उपवनसंरक्षक तथा सदस्य सचिव यांच्यामार्फत कमांड ऑफीसर यांना सदर जागेवरील काम थांबविण्याचे पत्र देखील पाठविण्यात आले आहे. | |
| १८ | **तक्रार क्र. २९**<br>श्री. सुनिल अगरवाल –<br>दि.१५.१२.२०१८<br>Destruction of Mangroves by Janakidevi Public School in Andheri (west) | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि. २२.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत श्री. नरेंद्र वर्मा यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.<br>• सदर क्षेत्रावर अद्याप Restoration ची कार्यवाही झालेली नसल्याने समितीने पुन्हा या जागेवर लवकरात लवकर Restoration करण्याच्या सूचना मुंबई महानगरपालिकेला दिल्या.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत Restoration चा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>२. मुंबई महानगरपालिका |
| १९ | **तक्रार क्र. ३०**<br>श्री. विनोद पुन्शी-<br>दि.१७.१२.२०१८<br>Effluents released in mangroves raise a stink-T.O. I. Navi Mumbai Report dated 16.12.2018 | • समितीने या तक्रारीबाबत MPCB च्या नोडल अधिकाऱ्यांसोबत स्थळ पाहणी करण्यास सांगितले व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना मागील बैठकीत दिल्या होत्या.<br>• परंतु MPCB मार्फत कोणीही प्रतिनिधी उपलब्ध नसल्यामुळे समितीने पुन्हा MPCB यांना उपस्थित राहण्यासाठी पत्र देण्यास सदस्य सचिवांना सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| २० | **तक्रार क्र. ३२**<br>श्री. प्रसाद खाले -<br>दि.१७.१२.२०१८<br>Destruction of Mangroves at Sagarmatha Club building, Colaba. | • सदर ठिकाणी कांदळवन क्षेत्रा लगत बांधकामे चालू आहेत.<br>• जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या अहवालानुसार आर्मी अधिकाऱ्यां विरुध्द FIR दाखल केलेला आहे.<br>• तसेच उपवनसंरक्षक तथा सदस्य सचिव यांच्यामार्फत कमांड ऑफीसर यांना सदर जागेवरील काम थांबविण्याचे पत्र देखील पाठविण्यात आले असून कमांडींग ऑफीसर याच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता सदर बांधकामे Soil erosion थांबविण्याकरिता करण्यात आले आहे व त्यामुळे कांदळवनास कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई शहर<br>२. सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक |
| २१ | **तक्रार क्र. ३५**<br>श्री. सुनिल अगरवाल –दि. १७.१२.२०१८<br>Destruction of Mangroves near Jaskhar wetlands in Uran | • इतिवृत्तातील मुद्दा क्र. १० तक्रार क्र. २० प्रमाणे | १. जिल्हाधिकारी, रायगड,<br>२. सिडको, नवी मुंबई. |
| २२ | **तक्रार क्र. ३७**<br>श्री. नंदकुमार पवार- | • या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींनी कांदळवनाची तोड झालेली नसून तेथे ब्रिजचे काम चालू | जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि.१९.०६.२०१८<br>2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow. | आहे असे त्यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या बाबतचा अहवाल एक आठवडयात समितीस सादर करण्यास सांगितले. | |
| २३ | **तक्रार क्र. ३८**<br>श्री. नंदकुमार पवार-<br>दि.१९.०६.२०१८<br>4) At terminal 4 of JNPT, 4550 mangroves trees (4.5 hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar have confirmed the killing of mangroves. This site yet to be visited FIR must be filed against JNPT for killing of mangroves. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार उरण यांनी JNPT मार्फत कांदळवनाचे नुकसान झाल्यामुळे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच या जागेवरील काम बंद करण्यात आले आहे असे सांगितले.<br>• तसेच वन परिक्षेत्र अधिकारी, उरण यांनी रु.१ लाख इतका दंड देखील ठोठावला आहे व यावर्षी २०१९ मध्ये पावसाळयात २००० कांदळवनाची रोपे लावण्याचे आदेश दिले आहेत.<br>• उपवनसंरक्षक तथा सदस्य सचिव यांनी देखील सदर जागेवर दि.३०.०४.२०१९ रोजी भेट दिली असून सदर जागेवरील कांदळवनात पाण्याचे प्रवाह सूरु करण्यात आले असून सदर ठिकाणी नवीन कांदळवनाचे पुनरुज्जीवन सुरु झालेले आहे असे दिसून येते.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी रायगड<br>तहसिलदार उरण |
| २४ | **तक्रार क्र. ३९**<br>श्री. नंदकुमार पवार-<br>दि.१९.०६.२०१८<br>5) Reclamation on mangroves at Belpada by JNPT, for SEZ. Dumping continues in full swing. | • या तक्रारी संदर्भात MPCB यांचे क्षेत्रीय अधिकारी, रायगड यांनी पनवेल न्यायालय दंडाधिकारी येथे रेती उत्खनन करणाऱ्यांवर विरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. Case RC-235/18<br>• तसेच सदर ठिकाणी सुरु असलेले Reclamation बंद करण्याच्या सूचना समितीने रायगड पोलीस यांना दिल्या.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्यास शिफारस करण्यात येत आहे. | जिल्हाधिकारी रायगड |
